**दि. २३ऑगस्ट २०१४**

**आय.एम.आर.च्या 'एच.आर. मिट २०१४'चे थाटात उद्घाटन**

जळगांव – येथील के.सी.ई.सोसायटीच्या इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, जळगांव हया व्यवस्थापनशास्त्र व संगणकशास्त्र शिकविणा–या संस्थेत उत्तम महाराष्ट्र विदयापीठ कार्यक्षेत्रातील सर्वात प्रथम व नाविण्यपूर्ण असा **'एच.आर. मिट २०१४'** उपक्रम आयोजित करण्यात आला होता. उदयोग सरकारी असो वा खाजगी उत्तमरित्या चालविण्यासाठी उत्तम मनुष्यबळाची आवश्यकता असते. महाविदयालये आणि इन्स्टिटयूट आपल्या पद्धतीने, पुस्तकी ज्ञानावर आधारित उत्तम मनुष्यबळ निर्मितीची प्रक्रिया पार पाडीत असतात. परंतू विदयार्थ्यांना प्रत्यक्ष उदयोगधंदयांमध्ये मनुष्यबळाचे महत्व काय असते, कुठल्या गोष्टी त्याठिकाणी चालतात, उत्तम मनुष्यबळाबद्दल उदयोगाच्या काय उपेक्षा हया सर्व शंकांचे निरसण होण्यासाठी व त्याचे सखोल ज्ञान मिळण्यासाठी प्रत्यक्ष उदयोगधंदयांमधील लोकांचे मार्गदर्शन मिळावे त्यांच्याशी उदयोगधंदयांमध्ये असलेल्या संधी व आवश्यक असलेल्या कौशल्यांसंबंधी संवाद साधता यावा हया उद्देशाने आय.एम.आर.ने हया **'एच.आर. मिट २०१४'** चे आयोजन केले होते.

सकाळी ९.३० वाजता हया मिटचे औपचारिक उद्घाटन पार पडले. उद्घाटन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी के. सी.ई. सोसायटीचे खजिनदार श्री सुरेश चिरमाडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री चरित्र जैन, डायरेक्टर एचआर जैन इरिगेशन, श्री विजय गांवकर जनरल मॅनेजर सुप्रिम इंडस्ट्रीज जळगांव, श्री गिरिषजी टिळक, रिझ्रूमे कन्स्लटंसी डोंबिवली व आय.एम.आर.चे संचालक सी.ए. डॉ. विवेक काटदरे उपस्थित होते. दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. आयएमआरच्या वतीने अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात संचालक सी.ए. डॉ. विवेक काटदरे यांनी हया मिटच्या आयोजनामागचा उद्देश उपस्थितांना समजावून सांगितला. उपस्थित अतिथींनी थोडक्यात मार्गदर्शन करून हा उद्घाटन सोहळा संपन्न केला. आभारप्रदर्शनाचे काम कार्यक्रम समन्वयक प्रा.ममता दहाड यांनी केले. तर सुत्रसंचलन सीबी मॅथ्यू हया विदयार्थ्याने केले.

उद्घाटनानंतरच्या सत्रात श्री गिरिषजी टिळक, रिझ्रूमे कन्स्लटंसी डोंबिवली यांनी विदयार्थ्यांना उदयोगासाठी लागणारे मनुष्यबळ व त्यासाठी आपल्याला आत्मसात करावे लागणारे कौशल्य कोणते हयाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. विदयार्थ्यांच्या मनात असलेल्या शंकांचे त्यांनी उत्तमरित्या समाधान केले. पुस्तकी माहितीचा उपयोग प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी करण्यासाठी आत्मसात करावे लागणारे विविध कौशल्य त्यांनी हयावेळे विदयार्थ्यांसमोर विषद केले. हया मार्गदर्शनानंतर उत्तम महाराष्ट्र स्तरावर कार्यरत असलेल्या व विविध उदयोगांच्या मनुष्यबळ विभागात काम करित असलेल्या मान्यवरांसोबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. हया चर्चासत्रासाठी श्री विजय गांवकर सुप्रिम इंडस्ट्रीज्, पी.एस.नाईक जैन इरिगेशन, प्रशांत उंबरे एम्को, हेमंत भिडे चेसिस ब्रेकस्, सी.एस.नाईक जैन इरिगेशन सहभागी होणार आहेत.

उत्तम महाराष्ट्र स्तरावरील विदयार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच उपक्रम असल्यामूळे हयाला प्रचंड असा प्रतिसाद लाभला. आयएमआर व परिसरातील इतर महाविदयालये मिळून हजारावर विदयार्थी हया उपक्रमासाठी उपस्थित होते. संस्थेचे संचालक डॉ विवेक काटदरे, यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम समन्वयक प्रा. ममता दहाड व आयएमआरच्या सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विदयार्थ्यांनी हया कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रयत्न केले.